दैनिक
महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक
# वादळ वार्ता
vadalvartanews@gmail.com
●मुख्य संपादक : अजय भांगे ●कार्यकारी संपादक : रमेश गुळभिले https://epaper.vadalvarta.com मो.न. ९४२२६६००७७
● बीड/महाराष्ट्र ● रविवार १८ ऑगस्ट २०२४ ● आरएनआय-एमएएचएमएआर/२०२३/८७५५५ ● वर्ष २ ले ● अंक ३ ● पाने ४ ● किंमत ४ रुपये







# विधानसभेत कोणता पक्ष किती जागा जिंकणार?

## राजकीय नेत्यांच्या झोप उडवणारा सर्वे आला समोर !




**नाशिक । सुरेश इंगळे**

महाराष्ट्रात येत्या २-३ महिन्यात विधानसभा निवडणूक होणार असून त्यामुळे सर्वच राजकीय पक्ष तयारीला लागले आहेत. राज्यात भाजप, एकनाथ शिंदेंची शिवसेना आणि अजित पवारांची राष्ट्रवादी काँग्रेस यांची महायुती विरुद्ध काँग्रेस, उद्धव ठाकरेंची शिवसेना आणि शरद पवारांची राष्ट्रवादी काँग्रेस यांची महाविकास आघाडीत जोरदार टक्कर बघायला मिळणार आहे. दोन्हीकडून आमचंच सरकार येणार असा विश्वास व्यक्त केला जात आहे. तत्पूर्वी आता 'टाइम्स नाऊ नवभारत' आणि 'मॅटराइज' या संस्थेने केलेला सर्वे समोर आला आहे. महाराष्ट्रात कोणत्या पक्षाला किती जागा मिळणार? कोणत्या पार्टीला किती मते मिळणार? याबाबतचा ओपिनियन पोल समोर आलेला आहे. महाराष्ट्रात विधानसभेच्या २८८ जागा आहेत. सत्ता स्थापन करण्यासाठी १४५ जागांची गरज लागते. टाइम्स नाऊ नवभारत आणि मॅटराइजच्या ओपिनियन पोल नुसार, भाजप हा राज्यातील सर्वात मोठा पक्ष ठरेल असं या सर्व्हेत दिसत आहे. भाजपला ९५-१०५ जागा मिळण्याचा अंदाज ओपिनियन पोलमध्ये आहे. एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेला मात्र यंदाच्या विधानसभेत फटका बसणार आहे. एकनाथ शिंदे गटाला केवळ १९-२५ जागा मिळतील असा अंदाज आहे. आश्चर्याची बाब म्हणजे महायुतीतील तिसरा पक्ष असलेल्या अजित पवारांना मात्र सर्वात मोठा झटका बसण्याची शक्यता आहे. कारण दादा गटाला अवघ्या ७-१२ जागा मिळणार असल्याचा दावा इम्स नाऊ नवभारत आणि मॅटराइजच्या ओपिनियन पोल मधून करण्यात आलाय. अन्य पक्षाना ११-१६ जागा मिळतील दुसरीकडे, महाविकास आघाडीबाबत सांगायचं झाल्यास, उद्धव ठाकरेंची शिवसेना आणि शरद पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसला पक्षपुटीचा फटका बसल्याचे या ओपिनियन पोल मधून स्पष्ट दिसत आहे. तर काँग्रेस मात्र २०१९ च्या निवडणुकीला जेवढ्या जागा मिळाल्या त्या कायम राखण्यात यश मिळवेल. महाविकास आघाडीत सर्वात मोठा पक्ष म्हणून काँग्रेस समोर आला आहे. काँग्रेसला ४२ ते ४७ जागा मिळतील, उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेला २६ ते ३१ जागांवर समाधान मानावे लागणार आहे. तर शरद पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसला २३ ते २८ जागा मिळण्याचा अंदाज ओपिनियन पोलमध्ये वर्तवण्यात आलं आहे. असं असलं तरी महाविकास आघाडी सत्ता स्थापनेपासून बरीच लांब दिसत आहे. त्यामुळे महाविकास आघाडीची झोप उडवणारा असा हा सर्वे आहे. यावर आता राजकीय नेत्यांकडून काय प्रतिक्रिया येते ते पाहायला हवं.

# राष्ट्रीय समाज पक्ष शेतकऱ्यांच्या बांधावर प्रा. अण्णासाहेब मतकर जिल्हाध्यक्ष .

## गेवराईच्या हिरापूर परिसरात शेतकऱ्यांच्या रानात जाऊन महिलांचे भरले फॉर्म. महिलांनी केले राष्ट्रीय समाज पक्ष्यांच्या पदाधिकाऱ्यांचे केले कौतुक.



**बीड प्रतिनिधी.**

गेवराई तालुक्यातील हिरापूर परिसरात राष्ट्रीय समाज पक्षाच्या पदाधिकाऱ्यांच्या वतीने माझी लाडकी बहीण योजनेचे फॉर्म थेट शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन रानात काम करत असणाऱ्या महिलांना दिली माहिती. महाराष्ट्र सरकारने मुख्यमंत्री लाडली बहिण योजना चालू केली आहे. आणि त्याचे अनेक महिलांनी फॉर्म भरलेले आहेत काही महिलांना पैसे पण आले आहेत. पण आज अनेक महिला या योजनेपासून वंचित आहेत. काहींनी फॉर्म भरलेले नाहीत त्यांना फॉर्म भरण्यासाठी वेळ भेटत नाही .किंवा माहिती नाही अशा महिलांसाठी राष्ट्रीय समाज पक्ष बांधावरती जाऊन त्या महिलांना योजनेची माहिती देत आहे. मा. राष्ट्र नायक महादेवजी जानकर साहेब यांनी राष्ट्रीय समाज पक्षाची निर्मिती समाजातील अठरापगड वंचित गोरगरीब लोकांसाठी स्थापना केलेली आहे. त्यामुळे या योजनेचा फायदा गरिबातील गरीब महिलांना भेटावा म्हणून राष्ट्रीय समाज पक्षाची टीम त्या महिलांपर्यंत जाऊन त्यांना माहिती देत आहे. या माध्यमातून राष्ट्रीय समाज पक्ष तळागाळातील लोकांपर्यंत जात आहे .व यामधून अनेक महिलांच्या समस्या लक्षात येत आहेत .काही महिलांकडे बँक अकाउंट नाहीत .किंवा फॉर्म भरण्यासाठी वेळ नाही .काही महिलांनी फॉर्म भरले आहेत. पैसे आलेले नाहीत .या कार्यामुळे राष्ट्रीय समाज पक्षांच्या कार्यकर्त्यांचे सर्व स्तरातून व महिलांकडून कौतुक केले जात आहे .या कामामुळे समाधान पण मिळत आहे . यावेळी उपस्थित. प्रा. अण्णासाहेब मतकर राष्ट्रीय समाज पक्ष जिल्हाध्यक्ष बीड .प्रा परशुराम काशीद विद्यार्थी आघाडी जिल्हाध्यक्ष .अंकुश गवळी युवा पत्रकार. दत्ता प्रभाळे ग्रामपंचायत सदस्य पिंपळगाव. संतोष सकारडे युवा नेते . धापसे सर. प्रवीण चव्हाण सर .गोरे कृष्णा सर. व महिला मंडळ पुरुष इतर उपस्थित होते. यावेळी महिलांनी राष्ट्रीय समाज पक्षाच्या पदाधिकाऱ्यांची केले कौतुक.

# स्वतंत्र दिनानिमित्त जमीयत कडून भव्य रक्तदान शिबिर संपन्न

## स्वातंत्र्याच्या चळवळीत अग्रेसर असणाऱ्या जमियत सामाजिक कार्यातही सर्वात पुढे-मुजतबा अहेमद खान

**नेकनूर । प्रतिनिधी**

नेकनूर येथे १५ ऑगस्ट रोजी स्वातंत्र्य दिनानिमित्त जमीयत उलेमा-ए- हींद च्या वतीने महाराष्ट्र क्लिनिक व महाराष्ट्र मेडिकल नेकनुर येथे व जिवनदायी ब्लड सेंटर अण्ड कंपोनन्ट एफरेसीस सेंटर बीड यांच्या सहकार्याने भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. शिबिरात नागरिकांनी भरभरून प्रतिसाद देत रक्तदान करून शिबिर यशस्वी केले आहे

शिबिराचे उद्घाटन जमीयत उलेमा चे मराठवाडा उपाध्यक्ष मुजतबा अहेमद खान सर यांच्या हस्ते करण्यात आले. रक्तदान सर्वश्रेष्ठ दान असून यावेळी अनेक मान्यवरांनी आपले विचार व्यक्त केले अध्याक्षीय समारोप करताना मुजतबा अहेमद खान सर म्हणाले की देशाच्या स्वातंत्र्यासाठी जमियत ही सामाजिक संस्था सर्वात अग्रेसर होती या लढ्याला हजारो उलेमानी आपल्या प्राणांची आहुती दिली आणि आज देशात जेथे कोठे




आस्मानी संकट असो किंवा मानव निर्मित संकट असो जमियत उलेमा मदत घेऊन सर्वात पुढे असते जमियत कोणाची जात धर्म बघत नसुन मानव सेवा हिच ईश्वर सेवा हाच उद्देश डोळ्यासमोर ठेवून काम करत आहेत मग ते सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रात ही मागे नाही शाहीन अकॅडमी बीड येथे जे हिंदू दलीत समाजाच्या गरीब मुलींना NIIT निट चे मोफत शिक्षण दिले जात असुन येथे त्यांना सर्व सुविधा सह सुरक्षिता दिली जात आहे याचा हिंदू व दलीत समाजाच्या मुलींनी लाभ घ्यावा तसेच या रक्तदाना मुळे कोणाचे तरी प्राण वाचणार आहे या पुण्याच्या कामात सर्वांनी पुढे आले पाहिजे असे आवाहन त्यांनी केले. या कार्यक्रमाचे अध्यक्ष मुजतबा अहमद खान सह मौलाना सय्यद साबेर अली रशिदी, माजी चेअरमन नामदेव काळे,माजी पं.स. सदस्य अनिल जाधव, पांडुरंग होमकर, जमात ए अमीर हाजी सय्यद लाईक,मुफ्ती सादेख,साहब ग्रा.पं. सदस्य ईजहारोद्दीन जहागीरदार, मा. ग्रा.पं सदस्य तथा पत्रकार सय्यद खालेद, मकसुद पहेलवान, महादेव मुळे, सय्यद नदीम, सय्यद मुस्तखीम,जिलानी पाशा, नसीम पाशा पत्रकार सय्यद अर्शद सह आदि उपस्थित होते.यावेळी जमियत उलेमा नेकनुर शाखेच्या वतीने रक्तदान शिबिरात रक्तदान करणाऱ्या व यासाठी अहोरात्र प्रयत्न करणाऱ्यांचे अभिनंदन करण्यात आले आहे.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ अर्शद शेख यांनी केले तर सूत्रसंचालन प्रा. मुजावर सर यांनी केले तर कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मौलाना साबेर यांच्या मार्गदर्शनाखाली जमीयते उलमा नेकनूर चे पदाधिकारी हाफेज अरबाज शेख साजेद,हाफेज फरहान,सय्यद अथर, सय्यद शहेबाज सय्यद आमेर, मोहसीन जहागीरदार, शेख आतीब,उमर काझी,नुमान मनियार, सय्यद उजेर,अयान शेख यांच्या सह जिवनदायी ब्लड सेंटर अण्ड कंपोनन्ट एफरेसीस सेंटर बीड यांचे सर्व कर्मचारी व जमियत चे सर्व पदाधिकाऱ्यांनी योग्य परिश्रम घेऊन शिबिर यशस्वी केले आहे.

# कौशल्या विद्यामंदिर व कनिष्ठ महाविद्यालयातील अक्षय सूर्यवंशी याची प्रो कबड्डी पर्व 11 मध्ये निवड




**छत्रपती संभाजीनगर(चैताली औटे)**

विश्वात्मा शिक्षण प्रसारक मंडळ छत्रपती संभाजीनगर संचलित कौशल्या विद्यामंदिर व कनिष्ठ महाविद्यालयाचा विद्यार्थी अक्षय सूर्यवंशी याची प्रो कबड्डी पर्व ११मध्ये यु.पी.योद्धा या संघाकडून बारा लाख नव्वद हजार रुपया मध्ये निवड करण्यात आली.या खेळाडूने कौशल्या कनिष्ठ महाविद्यालयाकडून खेळतांना महाविद्यालयीन संघांचे नेतृत्व केले होते. त्याच्या यशाबद्दल सर्वत्र कौतुकांचा वर्षाव होत आहे. महाविद्यालयाचे प्राचार्य श्री निलेशजी गायकवाड यांच्या हस्ते अक्षय व त्याचे प्रशिक्षक स्वप्नील गव्हाणे सर यांचा शाल,श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी शाळेतील सहशिक्षक नंदकिशोर पातकळ,बालाजी नलभे,स्वप्नजा पाटील,विजय सपकाळ,सोन्याबापू पालवे,नारायण औटे,भाऊसाहेब गायकवाड,अमोल गायकवाड,प्रकाश कामडी,अनिता तारख,आकेश दांडेकर,प्रविण काळे,शितल थिटे,अस्मिता भिसे,अक्षय शेळके,निखील पापुलवार,सतिष पवार,विठ्ठल त्रिभुवन,महेश गायकवाड,इत्यादी उपस्थित होते.

# रोहन गलांडे पाटील यांच्या मागणीला आले यश !

## आत्मदहनाचा इशाऱ्यांने मनरेगा रक्कम जमा करण्यास सुरुवात



**केज/ सचिन भालेराव**

केज तालुक्यातील प्रेत्येक ग्रामपंचायत अंतर्गत महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना म्हणजेच मनरेगाच्या माध्यमातून खोदलेल्या शेतकऱ्यांचे वयक्तीक लाभार्थ्यांचे सिंचन विहीर खोदण्यासाठीचे ४ लाख रुपये अनुदान व गायगोटा योजनेचे ७८ हजार अशा दोन्ही योजनेचे शासनाकडून निधी मागवून लवकरात लवकर लाभार्थी यांना रक्कम मिळावी व तात्काळ शासनाने द्यावी जर तात्काळ रक्कम देण्यात आली नाही तर केज पंचायत समिती समोर आत्मदहन करणार आहे असा इशारा शासनाला निवेदनाद्वारे अखिल भारतीय कुणबी मराठा महासंघ महाराष्ट्र राज्य केज तालुकाध्यक्ष रोहन गलांडे पाटील यांनी दीला होता तरी रोहन गलांडे पाटील यांच्या मागणीने केज तालुक्यातील विहीर लाभार्थी, शेतकरी यांना महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना अंतर्गत झालेल्या विहीरीची रक्कम शासनाने १६/०८/२०२४ रोजी शासनाने शेतकऱ्यांच्या खात्यावर विहीरीची रक्कम जमा करण्यास सुरुवात केली असून केज तालुक्यातील शेतकरी आनंदी झाले आहे तरी रोहन गलांडे पाटील यांनी असे म्हटले आहे आत्मदहन करण्याचा इशारा मागे घेत असुन जर गारगोटा विहीर रक्कम जमा करण्यास अडथळा निर्माण झाला तर दोन कोटी पेक्षा जास्त रक्कम शेतकऱ्यांन खात्यात जमा होईपर्यंत यापुढेही केज तालुक्यातील शेतकऱ्यांनसाठी विहीर,गायगोटे दोन कोटी रक्कम पुर्ण जमा होईपर्यंत केज तालुक्यातील शेतकरयांन साठी मी खंबीर पने उभा राहणार आहे असे रोहन गलांडे पाटील यांनी म्हटले आहे.

दोन कोटी पेक्षा जास्त रक्कम केज तालुक्यातील शेतकऱ्यांना मनरेगा योजने अंतर्गत खोदलेल्या विहीरीचे शेतकऱ्यांना मिळणार आहे तरी पुर्ण रक्कम जमा होईपर्यंत केज तालुक्यातील शेतकऱ्यांनच्या पाठीशी उभा असणारा आहे - रोहन गलांडे पाटील

# पवनराजे इंग्लिश स्कूल केज येथे ७८ वा स्वातंत्र्य दिन उत्साहात साजरा

## संस्थेच्या अध्यक्षा सौ. प्रणिता खडेराव चौरे मॅडम यांच्या हस्ते ध्वजारोहण

**केज । प्रतिनिधी**

पवनराजे इंग्लिश स्कूल केज तथा कै. राम चौरे प्राथ. माध्य व उच्च माध्यमिक विद्यालयात ७८ वा स्वातंत्र्य दिन उत्साहात साजरा करण्यात आला. या बाबत वृत्त असे केज तालुक्यातील तथा शहरात नामांकित शाळा म्हणुन प्रसिद्ध असलेली पवनराजे इंग्लिश स्कूल केज तथा कै. राम चौरे प्राथ. माध्य व उच्च माध्यमिक विद्यालयात ७८ वा स्वातंत्र्य दिन



उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून संस्थेच्या अध्यक्षा सौ. प्रणिता खंडेराव चौरे मॅडम होत्या तर प्रमुख पाहुणे म्हणुन संस्थेचे सचिव खंडेराव चौरे तसेच प्रिंन्सिपल अशोक मस्के सर हे होते . कार्यक्रमाच्या सुरुवातीला राष्ट्रपिता महात्मा गांधी तसेच भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमांचे पुजन करून ध्वजारोहण संस्थेच्या अध्यक्षा सौ. प्रणिता खंडेराव चौरे मॅडम यांनी केले. कार्यक्रमाचे अध्यक्षा तथा प्रमुख पाहुण्याचा सत्काराच्या कार्यक्रमानंतर शालेय विद्यार्थ्यांनी आपले मनोगत व्यक्त केले . अध्यक्षीय समारोपात स्वातंत्र्य दिनाचे महत्व व त्यासाठी दिलेले योगदान या विषयाने अध्यक्षीय समारोप झाला. सदरील कार्यक्रमाचे बहारदार सुत्रसंचालन सांस्कृतिक विभाग प्रमुख प्रिन्सिंपल डि.एस.चौरे सर यांनी केले तर आभार प्रिन्सिपल घुले सर यांनी मानले. दरम्यान सांस्कृतिक विभाग प्रमुख विशाल सिरसट सर यांनी विद्यार्थ्यांची उत्कृष्ट परेड घेऊन सर्वांची मने जिंकली. सदरील कार्यक्रमास विद्यालयातील एस.एन.चौरे सर , सिद्धार्थ शिनगारे सर , सुहास काळे सर , घुले पाटील सर, राऊत सर,निखील भांगे सर, केळसकर सर, चौरे मॅडम, मुळे मॅडम , मदिहा मॅडम , शेख मॅडम आदि शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी तथा आजी-माजी विद्यार्थी तसेच पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# अंतरवली सराटी मध्ये दोन लढाऊ नेत्यांची भेट!

## केज राखीव मतदार संघाबद्दल चर्चा झाल्याची माहिती



**अंतरवली सराटी । प्रतिनिधी**

मराठा लढाऊ नेते मनोज जरांगे व दलित, आदिवासी, मुस्लिम समूहासाठी लढणारे ऑल इंडिया पँथर सेनेचे राष्ट्रीय अध्यक्ष दीपक केदार यांची भेट. उशिरा तब्बल ३० मिनिटे या दोन नेत्यांमध्ये बंद दारावर दीर्घ चर्चा झाली. असे दीपक केदार यांनी सांगितले, मी सुरुवातीपासून मनोज जरांगे यांच्या आंदोलनात सोबत आहे. जिजाऊंच्या लेकीवर हल्ला झाला तेव्हा सुद्धा मी या ठिकाणी आलो होतो. मी ऊसतोड मजुराचा पोरगा आहे, जरांगे पाटील सुद्धा शेतकऱ्यांचा पोरगा आहे. कोणताही राजकीय वलय आम्हाला नाही. कायम संघर्ष करून सामाजिक लढा देत इथपर्यंत आलोत. हे आमच्यातलं साम्य आहे. एकमेकांना साथ द्यावी हाच या भेटी मागचा उद्देश आहे. जो निर्णय ते घेतील, त्यांनी तो अतिशय अभ्यासपूर्णरित्या घ्यावा. आपण संघर्ष करून इथपर्यंत आणलेल्या लढ्याचे नेतृत्व तिसऱ्यानीच करून "आयत्या बिळावरचे नागोबा" कुणाला होऊ देऊ नये. त्या अनुषंगाने काळजी घेतली पाहिजे. जो निर्णय घेतील त्या निर्णयाचे स्वतः त्यांनी नेतृत्व करावे, अशी दिपक केदार यांनी त्यांच्याकडे भूमिका व्यक्त केली. त्यांनी एकदा राजकीय भूमिका जाहीर केली की, आम्ही सुद्धा त्या संदर्भात भूमिका जाहीर करणार आहोत. आम्ही मराठा समाजासाठी लढतोय, याची मनोज जरांगेना कल्पना आहे, त्यांनी त्याबद्दल आभार व्यक्त केले याचा आनंद वाटतो. नक्कीच गरिबांच्या घरात राजकीय, सामाजिक सत्ता आणण्याचा त्यांचा अजेंडा स्तुत्य आहे. अनेक मुद्यावर चर्चा झाली, लवकरच पुन्हा भेटून मिडीयात सुद्धा भूमिका जाहीर केली जाईल. यावेळी सोबत बंटीदादा सदाशिवे महाराष्ट्र प्रवक्ते उपस्थित होते.



जिल्हाधिकारी यांना निवेदन वक्फ बोर्डाच्या जमिनीवर आणि वक्फ बोर्डामधे सरकारने हस्तक्षेप केले तर तीव्र स्वरूपाचे आंदोलन करण्याचा इशारा खुर्शीद आलम यांच्या मा.उपनगराध्यक्ष, नसीम इनामदार साहेब, गटनेते शेख सादेख,मा.नगरसेवक फसीभाई, सै.नबिलउजमा, राजु बेस्ट, रफीक भाई, जुबेर सौदागर सह आदिनीं एका निवेदनाद्वारे इशारा दिला आहे.

## रांजणीच्या सरस्वती भुवन प्रशालेत ग्रंथदिन साजरा

### पद्मश्री डॉ एस.आर.रंगनाथन यांच्या जन्मदिनी विद्यार्थ्यांसाठी ग्रंथ प्रदर्शन

**जालना । प्रतिनिधी**

घनसावंगी तालुक्यातील रांजणी येथील श्री सरस्वती भुवन माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात शनिवारी राष्ट्रीय ग्रंथदिनानिमित्त विद्यार्थ्यांसाठी ग्रंथ प्रदर्शन लावण्यात आले. या ग्रंथ प्रदर्शनाचे उद्घाटन शालेय समितीचे अध्यक्ष गौत भाऊ देशमुख यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी पद्मश्री डॉ एस.आर. रंगनाथन यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या प्रतिमेचे पूजन मुख्याध्यापक मधुकर बिरहारे यांच्या हस्ते करण्यात आले. ग्रंथ प्रदर्शन व पुस्तकांची मांडणी ग्रंथपाल संतोष जाधव यांनी सुंदररित्या केली होती. या ग्रंथ प्रदर्शनास प्रशालेतील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व प्रत्येक वर्गातील विद्यार्थ्यांनी भेट देऊन विविध पुस्तकांचा परिचय करून घेतला. तसेच आवडलेल्या पुस्तकांची मागणी ग्रंथपालांकडे नोंदवली. यावेळी शालेय समिती सदस्य डॉ.सिद्धिविनायक देशपांडे, ज्येष्ठ शिक्षक अतुल हेलसकर, रघुनाथ हाडे, विष्णू पाटील आदी उपस्थित होते. यावेळी मुख्याध्यापक मधुकर बिरहारे यांनी



विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना, विद्यार्थ्यांनी कायम वाचन करावे, अवांतर वाचनास वेळ द्यावा. 'पुस्तके आपल्याला जगायला आणि वागायला शिकवतात' असे मत व्यक्त केले. तसेच आनंददायी शनिवारचे औचित्य साधून प्रशालेत साने गुरुजी कथामाला या सदराखाली श्यामची आई पुस्तकातील पहिली कथा सावित्रीचे व्रत विद्यार्थ्यांना ऐकवण्यात आली. यावेळी अतुल हेलसकर यांनीही विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. ग्रंथ प्रदर्शन यशस्वी करण्यासाठी प्रशालेतील ग्रंथपाल संतोष जाधव व सहकाऱ्यांनी परिश्रम घेतले.

# पाटोदा तालुका वकील संघाचे अध्यक्षपदी ॲड.नागरगोजे तर सचिव पदी ॲड. सय्यद अशरफ यांची बिनविरोध निवड

**पाटोदा । प्रतिनिधी**

पाटोदा तालुका वकील संघाचे अध्यक्षपदाची बिनविरोध निवडीची परंपरा या वर्षीही कायम ठेवत पाटोदा वकील संघाच्या सर्व सदस्यांनी पाटोदा वकील संघाचे अध्यक्षपदी ॲड. एस.आर. नागरगोजे यांची अध्यक्षपदी निवड केली व उपाध्यक्षपदी ॲड.बी. आर लवुळ यांची निवड केली व तसेच सचिव पदी ॲड. सय्यद अशरफ यांची निवड केली निवडलेल्या नवीन कार्यकरणीचे सर्व स्तनातून अभिनंदन होत आहे पाटोदा वकील संघाच्या नवीन कारणी करण्याची निवड बिनविरोध करण्यात आली संघाचे मावळते





अध्यक्ष ॲड. एस. एस कवठेकर यांच्या अध्यक्षतेखाली बैठक होऊन नवीन कार्यकारणी निवडण्यात आली ॲड.एस आर नागरगोजे यांचे अध्यक्षपदी नाव सूचविले तर उपाध्यक्षपदी एडवोकेट बी आर लऊळ सचिव पदी एडवोकेट सय्यद अशरफ कोषाध्यक्ष म्हणून एडवोकेट थोरवे एस म्हणून ग्रंथपाल म्हणून एडवोकेट जगदाळे यांची निवड झाली महिला प्रतिनिधी म्हणून एडवोकेट गरजे यांची निवड झाली त्यास वकील संघाच्या सर्व सदस्यांनी बिनविरोध होकार देऊन वकील संघची नवीन कार्यकारणी निवडण्यात आली यावेळी वकील संघातील सर्व सदस्य हजर होते त्यात प्रामुख्याने ॲड. औटे,ॲड. कोल्हे, ॲड. यु.बी. जाधव व ॲड. जब्बार पठाण, ॲड. तळेकर, ॲड.एस.बी. जावळे व ॲड. विलास पवार ॲड.पांडव,ॲड. वैद्य,ॲड.बी.बी .जावळे ,ॲड. एस.बी कोकाटे ॲड. जगदाळे ॲड. एस एस चौरे व तसेच ॲड. विशाल मस्के , ॲड.तुषार जाधव ॲड. डि.एन. पारगांवकर इ.हजर होते. व तसेच सर्व नवीन कार्यकारणी शुभेच्छा दिल्या



# पै.सतीश शिंदे यांच्या झंझावात संवाद दौऱ्याने वातावरण बदलतंय!

## आष्टी-पाटोदा-शिरूर मतदार संघातील जनतेच्या तोंडी फक्त शिंदेंचे नाव!

### आष्टी तालुक्यातील दौऱ्याला जनतेकडून उदंड प्रतिसाद!

आष्टी आणि पाटोदा तालुक्यामध्ये पैलवान सतीश आबा शिंदे यांचा दौरा सुरू असून दोन दिवस असती दोन दिवस पाटोदा असे दौरे सुरू आहेत सध्या आष्टीतील दौऱ्याला जनतेकडून उदंड प्रतिसाद मिळत असून येणारी आमदारकी हे आबा तुमच्याच गळ्यामध्ये पडणार आहे पण तुम्ही फक्त जनतेचे काम करण्यासाठी कमी पडू नका तुम्ही पडत नाहीत आणि यापुढेही पडू नका अशा अपेक्षा जनतेकडून व्यक्त होत आहे.



**आष्टी | प्रतिनिधी**

येणाऱ्या विधानसभेच्या अनुषंगाने आष्टी पाटोदा शिरूर विधानसभा मतदारसंघामध्ये आयोजित गाव दौरा भेट सुरू केला आहे, या दौऱ्याला धामणगाव गटातील दौऱ्याला उत्फूर्त प्रतिसाद मिळतोय तसेच या संवाद दौऱ्यामध्ये ढोल ताशाच्या गजरात जंगी स्वागत करण्यात येत आहे, तेथील नागरिकांच्या अडीअडचणी जाणून घेत असून तुमच्या पाठीशी खंबीर उभा आहे असं आश्वासन आबाकडून मिळत आहे. अगोदरच्या विधानसभा निवडणूक मध्ये माघारी घेतली, तशी माघारी घेऊ नका, आम्ही तुमच्या पाठीशी आहोत, व तुमच्या शिवाय आष्टी मतदारसंघाला दुसरा पर्याय नाही, तुम्हीच जनतेचे प्रश्न सोडू शकतात, तसेच विद्यार्थ्यांचे प्रश्न शेतकऱ्यांचे प्रश्न सोडतान अशी अपेक्षा जनता बोलून दाखवत आहे. गनगेवाडी, खलाटवाडी येथील अखंड हरिनाम सप्ताह कार्यक्रमांना दौऱ्यानिमित्त भेट दिली. धामणगाव गटातील बीडसांगवी, किन्ही, बावी, खलाटवाडी, हातोला, धनगरवाडी, कापसी, डोईठाण, सांगवी (पा), कारखेल बु, हातोला, कापशी, डोईठण, या गावांना भेटी दिल्या. गाव भेट दरम्यान नागरिकांचा चांगलाच प्रकारे प्रतिसाद दिला. या दौऱ्याला प्रत्येक गावातून तितकाच उत्साहाने प्रतिसाद मिळत असून जनतेने आता एक प्रकारे ठरवलंच आहे की काय येणारा आमदार हा सतीश शिंदेच असणार असे चिन्हे उभा राहत असल्याचे दिसत आहे.

# शिरूर येथे इतरमागास व बहुजन कल्याण विभागाचा तालुकास्तरीय मेळावा

## शासनाच्या विविध योजनांचा लाभ घ्यावा-सहाय्यक संचालक श्रीमती मेश्राम

**शिरूर कासार**

शिरूर कासार:-दि.17 शिरूर येथे महाराष्ट्र शासनाच्या इतरमागास बहूजन कल्याण विभागाच्यावतीने राबविण्यात येत असलेल्या विविध योजनांची माहिती तळागाळातील लाभार्थीपर्यंत पोहचविण्याच्या उद्देशाने तालुकास्तरीय मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते.यावेळी इतरमागास बहुजन कल्याण विभाग बीड सहाय्यक संचालक श्रीम. एस.एन.मेश्राम मॅडम यांनी विविध योजनांची माहीती देऊन लाभ घेण्याचे आवाहन केले. यावेळी सामाजिक कार्यकर्ते आजीनाथ गवळी,सरपंच मिथून डोंगरे,पत्रकार गोकुळ पवार यांनी मनोगत व्यक्त केले.

महाराष्ट्र शासनाच्या इतरमागास बहूजन कल्याण विभागाच्यावतीने राबविण्यात येत असलेल्या विविध योजनांची माहीती तळागाळातील लाभार्थीपर्यंत पोहचविण्याच्या उद्देशाने तालुकास्तरीय मेळाव्याचे आयोजन सहाय्यक संचालक श्रीम.एस एन मेश्राम बीड यांच्या मार्गदर्शनाखाली पंचायत समिती कार्यालय शिरूर येथे करण्यात आले होते.यावेळी बहुजन कल्याण विभाच्या वतीने निरीक्षक लक्ष्मण बारगजे यांनी शासन राबवित असलेल्या योजनांची माहीती देतांना सांगीतले की महाज्योतीच्या माध्यमातुन विद्यार्थांच्या शिक्षणसाठी प्रशिक्षण व अर्थसहाय्य योजना,इतरमागासवर्गीय महामंडळामार्फत विविध कर्ज योजना तसेच श्यामराव पेजे कोकण इतरमागासवर्ग आर्थिक विकास महामंडळ,संत काशिबा गुरव यूवा आर्थिक विकास महामंडळ,जगतज्योती महात्मा बसवेश्वर आर्थिक विकास महामंडळ,संता सेनाजी महाराज केश शिल्पी आर्थिक विकास महामंडळ यासह ऊसतोड कामगारांच्या मुला-मुलीसाठी वस्तीगृह,वि.जा.भ.ज.साठी आश्रमशाळा,धनगर



समाजासाठी आवास व तांडावस्ती सुधार योजना आदी योजनांची साविस्तर माहीती दिली. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी नगराध्यक्ष रोहीदास पाटील गाडेकर हे होते तर व्यासपिठावर सामाजिक कार्यकर्ते आजीनाथ गवळी,संग्राम सेवाभावी संस्थेचे सचिव राजकुमार पालवे,निवासी शाळेच्या मुख्याध्यापिका आस्मिता जावळे,सरपंच मिठु जायभाये,मिथून डोंगरे,अविनाश केदार,महेश ढाकणे,शेषनारायण ढाकणे यांचेसह पत्रकार गोकुळ पवार,भारतकुमार पानसंबळ,प्रकाश साळवे,ग्रामसेवक संघटनेचे जिल्हाउपाध्यक्ष दिलीप मिसाळ व अशोक मिसाळ,कृषीविभागाचे बांगरसाहेब,पंचायत समितिचे संजय आघाव,गणेश सारूक,श्रीराम केदार,ग्रामसेवक संतोष गाडेकर,प्रविण मिसाळ,लांडगेसाहेब यांचेसह घरकुल योजनेचे लाभार्थी यांची मोठया संख्येने उपस्थिती होती.कार्यक्रमाचे सुत्रसंचलन श्री महादेव कातखडेसर यांनी केले तर आभार श्री.कल्याण उनवणे यांनी मानले.हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सिंदफणा प्राथमिक आश्रमशाळेचे मुख्याध्यापक किशोर गुंडसर यांचेसह किशोर खरमाटेसर,देवराव मस्केसर,विजय आंधळेसर,गणेश जायभायेसर,अशोक काटे,शिवाजी कदम यांनी परिश्रम घेतले.

# जिल्ह्यातील नागरिकांनी अवैध धंद्याची माहिती द्यावी-शहाजी उमाप

**नांदेड प्रतिनिधी : बालाजी सिरसाट**

नांदेड : नांदेड पोलीस परिक्षेत्रात शहाजी उमाप यांचे आगमन झाल्यानंतर त्यांनी चार जिल्ह्यातील पोलीस अधिक्षकांना अवैध धंदे समुळ नष्ट करण्याच्या सुचना दिल्या होत्या. त्यानुसार सर्व पोलीस अधिक्षकांनी आपल्या पोलीस अधिकारी आणि पोलीस अंमलदारांना 15 ऑगस्टपर्यंतची मुदत दिली होती. त्यात चार जिल्ह्यातील पोलीस पथकांनी 1 ऑगस्ट ते 15 ऑगस्ट या 15 दिवसांमध्ये चार जिल्ह्यात 2 कोटी 28 लाख 59 हजार 556 रुपयांचा मुद्देमाल अवैध व्यवसायीकांकडून जप्त केला आणि 1163 गुन्हे दाखल केले. शहाजी उमाप यांनी जनतेला सुध्दा अवैध्य धंद्यांची माहिती देण्याचे आवाहन केले आहे.



पोलीस उपमहानिरिक्षक कार्यालय नांदेड यांच्यावतीने देण्यात आलेल्या प्रेसनोटनुसार पोलीस उपमहानिरिक्षक शहाजी उमाप यांनी नांदेड पोलीस परिक्षेत्रात आल्याबरोबर सर्व प्रकारच्या अवैध्य धंद्यांचे समुळउच्चाटन करण्याच्या सुचना दिल्या होत्या. त्यानुसार चार जिल्ह्याच्या पोलीस पथकांनी हातभट्टीची दारु, दारुचे रसायन, देशी दारु, विदेशी दारु, सिंधी, गुटखा, गांजा, जुगार, अवैध वाळु उत्खन्न व अवैध वाहतुक या सर्व प्रकारच्या अवैध धंद्यांमध्ये कार्यवाही करत कामाची सुरुवात केली. या कामासाठी नांदेड जिल्ह्यात पाच, लातूर आणि परभणी जिल्ह्यात प्रत्येक चार आणि हिंगोली जिल्ह्यात तिन विशेष पथके अशी एकूण 12 पथके परिक्षेत्रात कार्यरत आहेत. मागील पंधरवाड्यात नांदेड पोलीस परिक्षेत्रात पोलीसांनी केलेल्या कार्यवाहीप्रमाणे नांदेड-356, परभणी-218, हिंगोली-213, लातूर 376 असे एकूण 1163 गुन्हे दाखल करण्यात आले. विविध अवैध्य व्यवसायीकांकडून नांदेड जिल्ह्यात 27 लाख 66 हजार 197, परभणी जिल्ह्यात 23 लाख 76 हजार 654, हिंगोली जिल्ह्यात 8 लाख 98 हजार 70 आणि लातूर जिल्ह्यात सर्वाधिक 1 कोटी 68 लाख 15 हजार 35 रुपयांचा मुद्देमाल असा एकूण 2 कोटी 28 लाख 59 हजार 556 रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. पोलीस उपमहानिरिक्षक शहाजी उमाप यांनी नांदेड, परभणी, हिंगोली आणि लातूर या चार जिल्ह्यातील नागरीकांना आवाहन केले आहे की, आपल्या भागात सुरू असलेल्या अवैध धंद्यांची माहिती पोलीसांना देवून अवैध्य धंदे पुर्णपणे, समुळउच्चाटन करण्यासाठी पोलीसांच्या मोहिमेत हातभार लावावा.



माजलगाव..जि प कन्या प्रशाला माजलगाव कबड्डी टीमने तालुकास्तरीय क्रीडा स्पर्धेत खोलेश्वर विद्यालय दिंद्रुड ला हरवून विजेतपद पटकावले. याबद्दल सर्व खेळाडूंचे व मार्गदर्शक शिक्षक राजकुमार सोनपसारे व मधुकर मकसरे सर यांचे खूप खूप अभिनंद केले

## शालेय शिक्षण समितीच्या अध्यक्षपदी पुनम घडसिंगे यांची निवड



माजलगाव प्रतिनिधी : - पुनंदगाव येथील शाळा व्यवस्थापन समितीची पुनर्रचनेची बैठक आज दिनांक १६ ऑगस्ट रोजी गटशिक्षण कार्यालयातील पोटभरे सर यांच्या अध्यक्षतेखाली व केंद्रप्रमुख झोंबाडे सर मुख्याध्यापक किर्ते सर, सरपंच रुद्रा कुरे यांच्या प्रमुख उपस्थितीत घेण्यात आली. यावेळी शालेय शिक्षण समितीच्या अध्यक्षपदी पत्रकार अनंत घडसिंगे यांच्या पत्नी पुनम घडसिंगे तर उपाध्यक्षपदी जयश्री गणेश काचूळे यांची खेळीमेळीच्या वातावरणात निवड करण्यात आली.या वेळी सदस्यपदी श्रीमंत पांडुरंग घडशिंगे, संगीता सतीश वानखेडे, मच्छिंद्र रतन क्षीरसागर, पूजा विकास घडशिंगे, भीष्मा अश्रूबा लोखंडे, नितीन रामभाऊ घडशिंगे, दिपाली परमेश्वर मुळे, अशोक भीमराव घडसिंगे, शेख अमजद इसुफ,तर प्राधिकरण सदस्य म्हणून विजयकुमार कटारे सर, विद्यार्थी प्रतिनिधी चि. यश सिद्धार्थ कदम, कु. कृष्णाजी संतोष लाड तर सचिव पदी भागवत रानोजी किर्ते यांची निवड करण्यात आली. यावेळी पत्रकार अनंत घडशिंगे,ग्रा.सदस्य भारत घडसिंगे ,ग्रा.सदस्य प्रल्हाद कुरे, बालाजी लोखंडे , भारत सातपुते, भीमराव घडसिंगे, रामभाऊ घडसिंगे ,जयराम अवचार, श्रीधर मुजमुले, बाळासाहेब मुजमुले,विकास घडसिंगे ,यांच्यासह पुनंदगाव, नांदूर, नागझरी, चिंचगव्हाण परिसरातील महिला व पालक उपस्थित होते. या निवडबद्दल गटशिक्षण अधिकारी कार्यालयातील पोटभरे सर , केंद्रप्रमुख झोंबाडे सर ,शाळेचे मुख्याध्यापक किर्ते सर, कटारे सर, गडगे सर, मोठे मॅडम, आबुज मॅडम यांनी स्वागत करून पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या. मनोज दादा जरांगे पाटील यांच्याकडून विशेष कौतुक करून सत्कार शालेय शिक्षण समितीच्या अध्यक्षपदी पत्रकार अनंत घडसिंगे यांच्या पत्नी पूनम घडसिंगे यांची निवड झाल्याबद्दल मराठा आरक्षणाचे जनक मनोज दादा जरांगे पाटील यांनी सराटी अंतरवाली येथे पत्रकार अनंत घडसिंगे यांचा विशेष सत्कार करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. या वेळी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष राजेसाहेब देशमुख, जिल्हा उपाध्यक्ष राहुल भैया सोनवणे, आ.जा.विभागाचे जिल्हाध्यक्ष दत्ताभाऊ कांबळे हे उपस्थित होते.

# संतांच्या केसालाही धक्का लागू देणार नाही

## वैजापूर येथील सराला बेटाचे महंत रामगिरी महाराज यांची मुख्यमंत्र्याकडून पाठराखण

**नाशिक ।सुरेश इंगळे.**

सिन्नर तालुक्यातील पंचाळे येथे सुरू असलेल्या १७७ व्या महंत गंगागिरी अखंड हरिनाम सप्ताहात महंत रामगिरी महाराज यांनी सप्ताह च्या दुसऱ्या दिवशी प्रवचनामध्ये मुस्लिम धर्माविषयी वादग्रस्त विधान केले होते. त्या वादग्रस्त विधानाचे व्हिडिओ सोशल माध्यमावर व्हायरल झाल्यानंतर त्याचे तीव्र प्रतिसाद काही भागात उमटले होते. या पार्श्वभूमीवर पांचाळे येथे



सप्ताह भेट आणि संत दर्शनास आलेल्या मुख्यमंत्र्यांनी भाषणादरम्यान, देशाला संतांची परंपरा लाभलेली आहे, त्यामुळे संताच्या केसालाही धक्का लावण्याची कोणाची ताकद नसल्याचे नमूद करीत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी वैजापूर येथील सराला बेटाचे महंत रामगिरी महाराज यांची पाठराखण केली.

त्यानंतर रामगिरी महाराज म्हणाले, सर्वच धर्मात काही कुप्रथा आहेत, त्या नष्ट झाल्या पाहिजे या अनुषंगाने मी बोललो, परंतु मी केलेल्या विधानाचा विपर्यास केला जात असल्याचे स्पष्टीकरण महंत रामगिरी महाराज यांनी दिले. येथे धर्माचा नव्हे तर कुप्रथेचा वाद आहे. हिंदू धर्माने ही अनेक कुप्रथा नष्ट केल्या आहेत, तशाच इतरांनीही कराव्या असे माझे म्हणणे असल्याचेही त्यांनी नमूद केले.

# गेल्या वेळी पैशाच्या बळावर जेवढी मते घेतली तेवढीच मते आता घेऊन दाखवा

## बदामराव पंडित यांचे विजयसिंह पंडितांना चॅलेंज

**गेवराई । प्रतिनिधी**

गेवराई तालुक्यातील शेतकऱ्यांना आणि सामान्य नागरिकांना मुक्तपणे जगता यावे आणि मूलभूत सुविधा उपलब्ध करून त्यांची आर्थिक प्रगती व्हावी यासाठी मी सातत्याने लढा दिला आहे आणि कामे केला आहे. एक वेळ शिवाजीराव पंडित यांनी तालुक्यासाठी काहीतरी काम केले हे मान्य करावे लागेल परंतु विजयसिंह पंडितांचे गेवराई तालुक्याच्या जडणघडणीत योगदान काय? आणि सामान्य नागरिकांच्या हितासाठी त्यांनी काय काम केले आहे? असा खडा सवाल करून, गेल्यावेळी पैशाच्या बळावर जेवढी मते घेतली होती, तेवढीच मते आता घेऊन दाखवावीत असे चॅलेंज शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे नेते माजी राज्यमंत्री बदामराव पंडित यांनी विजयसिंह पंडितांना दिले आहे.

शिवसेना उद्धव ठाकरे पक्षाच्यावतीने तलवाडा येथे शिवसैनिक आणि पदाधिकाऱ्यांचा मेळावा दिनांक १७ ऑगस्ट २०२४ रोजी संपन्न झाला यावेळी माजी राज्यमंत्री बदामराव पंडित बोलत होते. याप्रसंगी माजी उपसभापती भीष्माचार्य दाभाडे, माजी जी प सदस्य युवराज डोंगरे, माजी सभापती गीताराम डोंगरे, गोविंद जोशी, भागवत नाटकर, शेख रफिक, अशोक आठवले, अंबादास आठवले, राजेंद्र खिसते, राजाभाऊ तळेकर, सरपंच मुकुंद बाबर, सरपंच गोपीनाथ फलके, सरपंच भास्कर हातागळे, प्रकाश तळेकर, शिवाजीराव चव्हाण, शेख मुक्तार अली, गणेश चव्हाण, स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे जिल्हा उपाध्यक्ष खिझर शेठ, श्रीमंत यादव, पप्पू चौधरी, विष्णू नाटकर, कल्याणराव फलके, आदींची प्रमुख उपस्थिती होती.

पुढे बोलताना बदामराव पंडित म्हणाली की गेल्या 30 वर्षापासून माझ्याकडे काम घेऊन आलेल्या प्रत्येक माणसाचे मी काही ना काही काम केलेले आहे. ग्रामीण भागातील रस्ते असतील पाणीपुरवठा योजना असतील त्यासोबतच शाळा आरोग्य सेवा ३३ के व्ही केंद्र उभारून ग्रामीण भागातही सेवा उपलब्ध करून दिले आहेत आजही २४ तास मी सामान्य जनतेसाठी एका फोनवर उपलब्ध आहे. तालुक्यातल्या जनतेचे आणि माझी नाळ जुटलेली आहे दररोज कोणाचे ना कोणाचे काम केल्याशिवाय मलाही करमत नाही अशी स्थिती आहे. शेतकऱ्यांच्या आणि गोरगरिबांच्या प्रश्नावर मी नेहमीच आंदोलने केली आहेत न्याय मिळवून दिला आहे प्रत्येकासाठी झगडलो आहे आणि आजही झगडत आहे. येणाऱ्या काळात नागरिकांच्या समस्या सोडविण्यासोबतच अधिक गतीने विकास करण्यासाठी आपल्याला सत्तेत यावेच लागेल. मतदारसंघातली जनता आपल्या सोबतच आहे फक्त पदाधिकाऱ्यांनी त्यांच्यापर्यंत पोहोचून भेट घ्यावी आणि माझ्या वतीने त्यांना आशीर्वाद मागा. चहापाणी करून तुम्हाला ते आशीर्वाद देतील असा ठाम विश्वास व्यक्त करून बदामराव पंडित म्हणाले की या तालुक्याच्या जडणघडणीत आणि विकासासाठी शिवाजीराव दादा पंडित यांच्या खांद्याला खांदा लावून मी काम केले आहे. दादांनी काम केले हे आपण मान्य करू पण विजयसिंह पंडितांचे गेवराई तालुक्याच्या जडणघडणीत काय योगदान आहे? सामान्य माणसाचे त्यांनी काय काम केले आहे? असा खडा सवाल करून, गेल्या निवडणुकीत पक्षाचे उमेदवार असतानाही मतांसाठी पैसे वाटले, पैशाच्या बळावर मत विकत घेतले तरीही निवडणुकीत पडले. बदामराव पंडितांमुळे आपण सहा हजार मताने पडलो, असे आज सांगून विजयसिंह पंडित जनतेची दिशाभूल करण्याचा प्रयत्न करत आहेत. हिम्मत असेल तर आता निवडणूक लढा आणि जेव्हढी मते पडली होती तेवढीच घेऊन दाखवा असे चॅलेंज बदामराव पंडित यांनी दिले आहे. मी धर्म आणि जातीपातीचे राजकारण कधीच केले नाही आलेला प्रत्येक जातीचा माणूस हा माझ्याच कुटुंबातला समजून काम केले आहे. याच बळावर विधानसभा निवडणुकीला



सामोरे जात असून शिवसेनेचा भगवा फडकविण्यासाठी मायबाप जनतेने खंबीरपणे साथ द्यावी असे आवाहनही बदामराव पंडित यांनी केले आहे.


राष्ट्रवादी काँग्रेसचे दादासाहेब नाटकर पाटील यांनी यावेळी शिवसेनेत प्रवेश केला. श्रीमंतराव यादव, शिवाजीराव चव्हाण, गणेश चव्हाण, अशोक आठवले, शेख मुख्तार अली यांची समायोजित भाषणे झाली. कार्यक्रमास राजेंद्र विटकर, प्रकाश तळेकर, सिद्धेश्वर मडके, अनंतराव डरफे, दशरथ धुमक, रमेश फलके, केरूबा झणझणे, हरिभाऊ वावरे, बाबुराव खांडे, कल्याणराव फलके, शेख शेरूमिया, मदन करडे, अफसर भाई, खलील भाई, आकाश कांबळे, कैलास राठोड, संतोष निकम, चंदू मस्के, वेदांत जोशी, विशाल राऊत, आकाश शिंदे, बंटी भामरे, वैभव ढवारे, शेख इस्माईल, शेख हमजत, शेख सजाद , अनिल रविंद्र, शेषराव काळे, शेख इस्माईल आदींसह शिवसैनिकांची मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# पाटोदा महसूल मंडळावर निसर्गाची अवकृपा रात्रीत तीन इंच पाऊस

## सात आठ वर्षांनंतर मांजरा व साळ नदीला महापूर

## शेतकऱ्यांच्य खरीप पिकासह जमिनीची मोठे नुकसान शेतकरी हातबल





### जिल्हाधिकाऱ्यांनी तातडीने पंचनामे करावेत

**पाटोदा । प्रतिनिधी**
पाटोदा तालुक्यातील चारही महसूल मंडळावर पावसाळ्याच्या दिड महिन्यात फक्त आठ दहा दिवस वगळता रोजच पावसाची हजेरी असल्यामुळे शेतकऱ्यांचे खरीप पिकाची पूर्णपणे वाट लागली होती त्यातच पुन्हा शनिवारी रात्री तब्बल दोन वाजल्यापासून चार वाजेपर्यंत दोन तासात तीन इंच मुसळधार पाऊस झाला यामुळे सात आठ वर्षानंतर पाटोदा तालुक्यातील वाहत असलेल्या साळ व मांजरा नदीला मोठा महापूर आला असून शेतकऱ्यांचे खरिप पिकासह मोठे नुकसान झाले आहे नदीचे अनेक घरात पाणी शिरल्याने लोकांना मोठा मानसिक त्रास सहन करावा वेळीच याची दखल घेऊन जिल्हाधिकाऱ्यांनी शेतकऱ्यांना आर्थिक मदत सह विमा कंपनीने विमा द्यावा अशी मागणी होत आहे दरम्यान राष्ट्रवादी शरद पवार गटाचे तालुकाध्यक्ष शिवभूषण जाधव यांनी तहसील कार्यालय मध्ये अतिवृष्टीच्या संदर्भात शेतकऱ्यांना मदत द्यावी अशी मागणी केली आहे पाटोदा तालुक्यात यावर्षी निसर्ग मोठा मेहरबान होता मृग नक्षत्र पेरणी झाल्यापासून पावसाने दीड महिन्याच्या कार्यकाळात आठ-दहा दिवसाचा खंड वगळता पावसाची नेहमीच हजेरी होती तालुक्यातील जमिनी हलके असल्यामुळे अनेकांच्या शेत उफळले असून खरीप पिकांचे वाढ खुंटून पीक पूर्णपणे पिवळे प पडल्याने खरीप पिकाचे मोठे नुकसान झाले होते त्यातच शुक्रवारी रात्री निसर्गाची पाटोदा महसूल मंडळावर अवकृपा झाली रात्री शनिवारी दोन वाजल्यापासून ते चार वाजेपर्यंत तब्बल तीन इंच पाऊस ७१.५ मिलिमीटर पाऊस झाल्याने शेतकऱ्यांची नदीकाठची सोबतच माळरानाची पीक हे वाहून गेली या वस्तू सोबतच अनेक शेतकऱ्यांच्या जमिनी खोदून खडकायला लागले आहेत निसर्गाच्या या अवकृपेने शेतकरी मोठा हातबल झाला असून जिल्हाधिकारी महोदयांनी या पाटोदा महसूल मंडळ उद्भवलेल्या नैसर्गिक आपत्तीचा पंचनामा करून सरसकट शेतकऱ्यांना खरीप विमा सोबतच आर्थिक मदत देण्यात यावी अशी मागणी शेतकरी वर्गाकडून होत आहे सततच्या पावसाने पाटोदा तालुक्यातील मध्यम प्रकल्प यापूर्वीच पूर्णपणे भरले असून रात्रीच्या पावसाने पाणी सांडव्यावरून मोठ्या प्रमाणात वाहत आहे पाझर तलाव गाव तलाव व विहिरी सुद्धा काठोकाठ भरलेल्या आहेत सोयाबीन कापूस मुग उडीद हे पीक पिवळे पडून त्यांची वाढ पूर्णपणे खुंटली होती अशाच वेळी शनिवारी रात्री दोन वाजता वाजल्यापासून पाटोदा महसूल मंडळात निसर्गाची अवकृपा झाली दोन ते चार वाजेपर्यंत मुसळधार पाऊस झाल्याने नदी नाले एक झाली सात-आठ वर्षा नंतर लोकांना मांजरा व साळ नदीला पूर आल्याचे पहावयास मिळाले रात्रीतून अचानक पाऊस झाल्याने नदीकाठी राहणाऱ्या अनेक घरात पाणी शिरल्याने अनेक लोकांना याचा त्रास सहन करावा लागला तो मोठ्या प्रमाणात पूर आलेला दिसत होता आणि पुराचे पाणी शेतकऱ्याच्या शेतात शिरल्याने शेतकऱ्याची पिकासह जमिनीचे अतोनात नुकसान झालेले दिसत आहे शेतकरी या निसर्गाच्या अवकृपेने मोठ्या आर्थिक अडचणीत आलेला दिसत आहे अनेक शेतकऱ्यांच्या शेतात पाणी साचल्याने व तसेच पिकावर गाळ बसल्याने शेतकऱ्याच्या पिकाचे नुकसान झाले आहे प्रति शेतकऱ्यांना याअशा उद्भवलेल्या कठीण प्रसंगी जिल्हाधिकारी महोदयांनी तातडीने पंचनामे करण्याचे आदेश देऊन शेतकऱ्यांना आर्थिक मदत देऊन सोबतच पिक विमा मिळून देण्यात ही संदर्भात कार्यवाही करावी अशी शेतकरी वर्गाकडून मागणी होत आहे दरम्यान शरद चंद्र पवार गटाचे राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुकाध्यक्ष शिवशंकर पाटोदा तहसीलदार निवेदन देऊन शेतकऱ्याला झाली नुकसानीची पाहणी करून शेतकऱ्यांना तातडीने आर्थिक मदत देण्याची मागणी केली आहे सध्या शेतकरी हातबल डोळ्याने आपल्या उभ्या पिकाची वाटोळे होताना बघत आहे अनेक वर्षानंतर पाटोदा मांजरा नदीला व साळ नदीला आलेला महापूर पाहण्यासाठी पहाटेपासूनच लोकांची नदीकाठी गर्दी दिसत होती अनेकांनी हे दृश्य आपल्या मोबाईल मध्ये कैद करताना दिसत होते अतिवृष्टीमुळे तालुक्यातील सर्व शाळांना प्रशासकीय सुट्टी देण्यात आली आहे

# सुधागड़ विद्या संकुलात रक्षा बंधन सण साजरा



पनवेल / प्रतिनीधी
कळंबोली सुधागड विद्यासंकुलात रक्षाबंधन सण मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. ५ वी ते ८ व्ही च्या विद्यार्थ्यांच्या राखी बनविणे स्पर्धा घेण्यात आल्या. यावेळी राखी प्रदर्शन भरविण्यात आले होते. या उपक्रमाचे उदघाटन मा. प्रा. श्री . पालवे सर यांच्या हस्ते झाले. हा उपक्रम उपमुख्याध्यपक श्री शिंदे एस बी यांच्या मार्गदर्शना खाली राबविण्यात आला. या स्पर्धेत सर्व विद्यार्थ्यांनी मोठ्या उत्साहात भाग घेतला होता.

# श्याम माध्य.व उच्च माध्य.कला व विज्ञान महाविद्यालयात ७८ वा स्वातंत्र्य दिन उत्साहात साजरा

### प्राचार्या.श्री. जयश्री ईप्पर मॅडम यांच्या हस्ते ध्वजारोहण

केज । सचिन भालेराव
वडमाऊली विद्याप्रसारक मंडळ संचलित श्याम माध्य.व उच्च माध्य. कला व विज्ञान महाविद्यालयात ७८ वा स्वातंत्र्य दिन उत्साहात साजरा करण्यात आला. या बाबत वृत्त असे

केज तालुक्यातील दहिफळ (वड ) येथील श्याम माध्य.व उच्च माध्य.कला व विज्ञान महाविद्यालयात ७८ वा स्वातंत्र्य दिन उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाचे



अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाच्या प्राचार्या.श्री. जयश्री ईप्पर मॅडम या होत्या तर प्रमुख पाहुणे म्हणून संस्थेच इंजि. शरद (बप्पा ) गदळे हे होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीला राष्ट्रपिता महात्मा गांधी तसेच भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमांचे पुजन करून ध्वजारोहण प्राचार्या.श्री. जयश्री ईप्पर मॅडम यांनी केले. त्यानंतर कार्यक्रमाचे अध्यक्ष तथा प्रमुख पाहुण्याचा सत्काराच्या कार्यक्रमानंतर शालेय तथा महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी आपले मनोगत व्यक्त केले तसेच अध्यक्षीय समारोपात स्वातंत्र्य दिनाचे महत्व व त्यासाठी दिलेले योगदान या विषयाने अध्यक्षीय समारोप झाला. सदरील कार्यक्रमाचे बहारदार सुत्रसंचालन सांस्कृतिक विभाग प्रमुख डोईफोडे सर यांनी केले तर आभार उपप्राचार्य गंदगे आर.व्ही.यांनी केले. सदरील कार्यक्रमास महाविद्यालयातील सोळंके पी.एस., गपाट एम.टी, गायकवाड एम.जी.,.राऊत टी. एम., मुंडे बी. एम., भालेराव डी.ए., कुटे व्ही. व्ही., सिरसाट एम. एस., खेडकर एच. बीं.,मुंडे एस. पी.,खाडे ए. एस.,कदम मॅडम,मेहेत्रे मॅडम ,नागरगोजे आर. आदि शिक्षक ,कनिष्ठ प्राध्यापक,शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी तथा आजी-माजी विद्यार्थी तसेच गावकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# मुख्यमंत्री–माझी लाडकी बहीण योजनेतंर्गत लाभार्थी महिलांच्या खात्यावर नियमितपणे जमा होणार रक्कम–पालकमंत्री अतुल सावे

### रक्षाबंधनानिमित्त बहिर्णीना मिळाली उत्कृष्ट भेट, माझी लाडकी बहीण योजनेचा शुभारंभ कार्यक्रम संपन्न

**गेवराई/प्रतिनिधी**
गेवराई तालुक्यातील सिरसदेवी गावात गेल्या दोन दिवसा पासून सिरसदेवी फाटा पासून जवळच असलेल्या अडागळे वस्तीवर चोरांनी सुळसुळाट लावला आहे हे चोर रात्रीच्या ८ ते १० वाजण्याच्या सुमारास वस्तीवर दगडफेक करून वस्तीवरील नागरिकांना त्रास देऊन पळ काडत असल्याचे माहिती आहे.तसेच अडागळे वस्तीवर दगडफेक करून सिरसदेवी गावात हे चोर धुमाकूळ घालत आहेत यामुळे सिरसदेवी परिसरातील नागरिका मध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. यामुळे पोलीस प्रशासनाणे या चोरांचा वेळीच बंदोबस्त लावण्याची मागणी परिसरातील नागरिकांमधून होत आहे. तसेच आज दि.१५/०८/२०२४ रोजी अडागळे वस्तीवर ८ वाजनेच्या सुमारास काही अज्ञात चोरांनी ठराविक घरावर दगडफेक करून पळ काढला परंतु काही युवकांनी त्या चोरट्याना पाळताना बघितल्यावर त्यांच्या माघे वस्तीवरील युवकानी पाठलाग केला परंतु चोरट्यानी धूम ठोकल्याने चोरटे पकडण्यात यश आले नाही त्यामुळे वस्ती वरील काही युवकांनी तलवाडा पोलिसांना या घटनेविषयी माहिती फोनवर दिली असता घटनास्थळी



तात्काळ तलवाडा पोलीस दाखल झाली व या घटनेविषयी माहिती घेऊन अडागळे वस्तीवरील नागरिकांना सतर्क राहण्याचे आव्हान केले तसेच काही अडचण आल्यास आम्हाला फोन करा सांगितले. तसेच यावेळी अडागळे वस्तीवरील नागरिकांनी व युवकानी तलवाडा पोलिसांना विनंती केली कि गेली दोन दिवस झाले हे चोरटे वस्तीवर येऊन घरावर दगडफेक करून पळून जातात त्यामुळे वस्तीवरील महिला, लहान मुले भयभीत झाले आहेत त्यामुळे आपण अडागळे वस्तीवर पोलीस संरक्षण देण्यात यावे अशी मागणी तलवाडा पोलिसांना केली असता या मागणी विषयी तलवाडा पोलिसांनी वसतिवारील नागरिकांना समाधानकारक उत्तर दिले कि आम्ही आपल्या वस्तीवर वेळोवेळी आम्ही पेट्रोलिंग करू तसेच काही अडचण आल्यावर आम्हाला फोन करा तसेच चोर दिसल्यास त्याचा पाठलाग करून त्याला पकडून आमच्या ताब्यात द्यावे असे बोलून तलवाडा पोलीस अडागळे वस्तीवरुन निघून गेले. जर आज रात्री किंवा उद्या रात्री अनुचित प्रकार अडागळे वस्तीवर चोराकडून घडला तर याला जीमेदार कोण? असा प्रश्न सिरसदेवी परिसरातील नागरिक व युवकामधून उपस्थित होत आहे.तसेच तलवाडा पोलिसांनी चोरांचा बंदोबस्त लवकरात लवकर करावा अशी मागणी नागरिक करत आहेत.

# स्वातंत्र्य दिनानिमित्त कुमार पार्क बिबवेवाडी सोसायटी रक्तदान शिबिर व आरोग्य तपासणी शिबिर संपन्न



**पुणे /पंकज भंडारी** १५ ऑगस्ट भारत स्वातंत्र्य दिनानिमित्त कुमार पार्क सोसायटी बिबवेवाडी येथे रक्तदान शिबिर व आरोग्य तपासणी शिबिर आयोजित करण्यात आले होते. भारताचा ७८ वा स्वातंत्र्य दिन मोठ्या उत्साहाने साजरा करण्यात आला या कार्यक्रमांमध्ये जास्तीत जास्त लोकांनी सहभाग घेतला तसेच रक्तदान शिबिरांमध्ये ५८ लोकांनी रक्तदान केले तसेच जास्तीत जास्त लोकांनी आरोग्य तपासणी करून घेतली विशेष या कार्यक्रमांमध्ये २२ युवा युवतींनी पहिल्यांदा रक्तदान केले. या शिबिरासाठी आचार्य राष्ट्रसंत आनंद ऋषिजी ब्लड बँक यांचे सहकार्य लाभले. या कार्यक्रमासाठी प्रमुख उपस्थिती आमदार सुनील भाऊ कांबळे ,आमदार माधुरीताई मिसाळ ,आमदार रवींद्र भाऊ धंगेकर, रक्ताचे नाते ट्रस्टचे राम सर बांगड , माईंड पॉवर मार्गदर्शक डॉक्टर दत्ता कोहिंकर (पाटील), अखिल भारतीय मराठी चित्रपट महामंडळाचे अध्यक्ष मेघराज राजे भोसले, सिद्धी ग्रुपचे ललित जी जैन व मुकेशजी छाजेड, अभयजी छाजेड , प्रवीणजी चोरबेले, सिनेमा अभिनेत्री स्वाती हनमगर ,संतोष नांगरे,पी एस आय मदन कांबळे, तसेच शिबिराचे चे उद्घाटन सोसायटीमधील ज्येष्ठ नागरिक यांच्या हस्ते करण्यात आले. या कार्यक्रमाची जबाबदारी व यशस्वी करण्यासाठी सोसायटीतील महिला मंडळांनी व युवा युवा त्यांनी घेतली. स्नेहजा पाटील, वर्षा साठे, कल्पना लाहोटी, सुनिता पुंगलिया, पूजा कावेडिया, शकुंतला गुरव, मनीषा जगताप,मीनाक्षी दाधीच या कार्यक्रमासाठी लक्ष्मीकांत भाऊ लाहोटी व गिरिशभाऊ सोळंकी यांनी सहकार्य केले.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अजय महादेव भांगे यांनी निर्मिती प्रिंटिंग प्रेस, टाकळी रोड , धोंडीपुरा , जोशी नर्सिंग होमच्या समोर बीड ता.जि. बीड ४३११२२ येथे छापून दैनिक वादळवार्ता कार्यालय, महात्मा फुले नगर केज, पाण्याच्या टाकीजवळ केज ता. केज जि. बीड ४३११२३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.मो.न.९४२२६६००७७

This newspaper is printed by owner, printer,publisher,editor Ajay Mahadev Bhange at nirmiti printing press, takli road, dhondipura in front Joshi nursing Home,Beed,tq.Beed,Dist.Beed 431122, Maharashtra and published at Dainik Vadalvarta office Mahatma Phule Nagar, near water tank kaij tq.kaij dist.Beed 431123(Maharashtra) mo.no.9422660077